# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### सर्वोदयनगर व आनंदनगर गृहनिर्माण संस्था (नियोजित) भांडूप (प), मुंबई येथे झोपडपट्टी स्लम-क्लस्टर राबविण्याबाबत

**(१) २३०३४ (११-०८-२०१५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भांडूप (प) येथील सर्वोदयनगर व आनंदनगर गृहनिर्माण संस्था (नियोजित) सर्व्हे क्र. १३७ या भूखंड क्रमांक १०३ व भाग १ ते ५ या भूखंडावरील झोपडपट्टी स्लम-क्लस्टर यांना राबविण्यासाठी सर्व संबंधितांची मा.मुख्यमंत्री यांचेसोबत बैठक आयोजित करण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी त्यांच्या दिनांक ०९ जानेवारी, २०१५ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत वा कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश महेता (२२-०८-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) लोकप्रतिनिधी यांच्या पत्रातील विनंतीच्या अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून अहवाल मागविण्यात आला आहे. सदरचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

---

**नालासोपारा (ता.वसई, जि.पालघर) येथील गालानगर येथे दूषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत**

**(२) २८२०९ (२१-०१-२०१६). श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नालासोपारा (ता.वसई, जि.पालघर) येथील वसई-विरार महानगरपालिकाद्वारे गालानगर परिसरात माहे जून, २०१५ पासून नळाद्वारे गढूळ युक्त दुषीत पेयजलाचा पुरवठा होत असल्याने तेथील नागरिकांना पाणी टंचाई निर्माण झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील नागरीकांना बोअरवेल तसेच टँकरचे पाणी आणून वापरावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर गालानगर परिसरात पेयजलाच्या पुरवठा व्यवस्थेसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०८-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) गळती दुरुस्ती लगेच केली असल्याने टँकरचे पाणी सध्या वापरावे लागले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील तीन मेट्रो प्रकल्पाबाबत**

**(३) २८७४१ (२५-०७-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मेट्रो प्रकल्पाला २३ हजार १३६ कोटी, वडाळा-घाटकोपर-तीनहात नाका (ठाणे)-कासारवडवली मेट्रोसाठी २० हजार कोटी व दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द या मेट्रो प्रकल्पासाठी ३४ हजार कोटी असा ७७ हजार कोटीचा खर्च येणार आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तीन मेट्रो प्रकल्पासाठी सुमारे किती हेक्टर जागा लागणार आहे, त्यामध्ये खाजगी मालकीची जागा किती लागेल,

(३) असल्यास, या तीन्ही मेट्रो प्रकल्पाच्या कामाला गती मिळण्यासाठी मा.मुख्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली दिनांक २१/०८/२०१५ रोजी एक उच्चस्तरिय बैठक घेण्यात आली हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बैठकीत कोणते निर्णय घेण्यात आले आहेत व त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे, तसेच मार्गिकेला मंत्रालया समोरील 'सारंग' या न्यायमूर्तीची निवासस्थाने असलेल्या इमारतीच्या आवारातील जागा देण्यास उच्च न्यायालय प्रशासनाने न्यायमूर्तींच्या सुरक्षेच्या कारणास्तव आक्षेप घेतला आहे हे ही खरे आहे काय,
(५) तसेच या तीनही मेट्रो प्रकल्पांचे स्वरुप काय आहे  तसेच सदर प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१६)** :(१) मुंबईतील कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मेट्रो प्रकल्पाला २३ हजार १३६ कोटी इतका खर्च आणि मे.राईटस्या सल्लागार संस्थेमार्फत वडाळा-घाटकोपर-ठाणे-कासारवडवली या अंशत:/पूर्णत:भुयारी मार्गाचा आणि दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द या मेट्रो मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला.

या अहवालानुसार वडाळा-घाटकोपर-ठाणे-कासारवडवली मेट्रो प्रकल्पासाठी रु.२०,००० कोटी व दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द या मेट्रो प्रकल्पासाठी रु.३४,००० कोटी खर्च अंदाजित करण्यात आला होता. तसेच मार्ग २ ब डी.एन.नगर-मानखुर्द-मंडाले आणि मेट्रो मार्ग-४ वडाळा-घाटकोपर-तीन हात नाका (ठाणे)-कासारवडवली हा मेट्रो उन्नत करण्याकरीता अद्यावत प्रकल्प अहवाल अनुक्रम फेब्रुवारी २०१६ व मे, २०१६ मध्ये प्राधिकरणास सादर केला.तसेच १३९ व्या बैठकीत मेट्रो मार्ग २ब प्रकल्पास आणि दिनांक ३ जून, २०१६ रोजी झालेल्या १४० व्या बैठकीत मेट्रो मार्ग-४ ला मान्यता मिळाली असून, मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.
(२) कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो करीता एकूण ७८.६७ हेक्टर जागा लागणार आहे. तसेच कायमस्वरुपी खाजगी जमिन-०.७५ हेक्टर, तात्पुरती खाजगी जमिन-२.९० हेक्टर जागा लागणार आहे.

मेट्रो मार्ग-२ अ दहिसर ते डी.एन.नगर मेट्रो करीता एकूण २.१५ हेक्टर जमिनीपैकी इतर लागणारी जमीन (अंदाजित) कार डेपो वगळून-खाजगी-०.५० हेक्टर जमीन लागणार आहे. तसेच प्रस्तावित कार डेपोसाठी १९.५९ हेक्टर (नगर भूमापन क्रामंक-६ अ, मालवणी) जागा लागणार आहे.

मेट्रो मार्ग-२ ब डी.एन.नगर ते मंडाळे मेट्रो करीता एकूण ८.८७ हेक्टर जमिन लागणार असून त्यापैकी इतर लागणारी जमीन (अंदाजित) कार डेपो वगळून-खाजगी-३.६१ हेक्टर लागणार आहे. प्रस्तावित कार डेपोसाठी २२ हेक्टर (मंडाळे) आणि तात्पुरती लागणारी जमीन (बांधकाम दरम्यान)-२२.०० हेक्टर.

मेट्रो मार्ग-४ वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली मेट्रो करीता एकूण ४३.५१ हेक्टर जमिनीपैकी इतर लागणारी जमीन (अंदाजित) कार डेपो वगळून-खाजगी-३७.९६ हेक्टर जमिन लागणार आहे. प्रस्तावित कार डेपो-३० हेक्टर (ओवाळे) व तात्पुरत्या लागणारी जमीन (बांधकाम दरम्यान) १३.२ हेक्टर (शासकीय).
(३) मुंबईतील कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मेट्रो करीता दिनांक २१/०८/२०१५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

(४) मुंबईतील कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मेट्रोच्या विषयाबाबत मुख्य न्यायधीक्ष उच्च न्यायालय, बॉम्बे यांच्या बरोबर बैठक व स्थळ पाहणी करण्यात आलेली आहे. सदर सारंग इमारतीच्या आवारातील जागा तात्पुरत्या स्वरुपात मेट्रो प्रकल्पाला मिळण्याबाबतची कार्यवाही प्रगती पथावर सुरु आहे.

(५) मेट्रो-३ कुलाबा-वांद्रे-सिप्झ हा पुर्णत: भुयारी आहे. मार्गाची लांबी ३३.५ कि.मी., एकूण स्थानके २७ (२६ भुयारी+१ जमिनीवर), नरीमन पॉईट, वरळी, वांद्रा-कुर्ला संकुल, आंतरराष्ट्रीय व आंतरराज्यीय विमानतळ, केंद्रांना आधुनिक प्रणालीच्या मेट्रो सेवेने जोडण्यात येणा आहे. कार डेपो-कांजुरमार्ग आणि आरे कॉलनी, प्रवाशी संख्या-२०२१-१४ लाख, २०३१-१७ लाख, प्रकल्प पुर्णत्वाचा खर्च २३,१३६ कोटी, प्रकल्प २०२० मये पुर्ण करण्याचा मानस आहे.

मेट्रो मार्ग-२अ दहिसर ते डी.एन.नगर मार्गाचे स्वरुप-मार्गाची लांबी-१८.६० कि.मी. संपुर्णत: उन्नत एकूण स्थानके-१७, प्रकल्पाच अपेक्षित खर्च- रु.६४१० कोटी, दैनंदिन प्रवासी क्षमता-सन २०२१-२२-४.०७ लाख व सन २०३१-३२-६.०९ लाख, प्रकल्प पूर्णत्वाचा कालावधी सन २०१९ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

मेट्रो मार्ग-२ब डी.एन.नगर ते मंडाळे मार्गाचे स्वरुप-मार्गाची लांबी-२३,६४३ कि.मी. एकूण स्थानके-२२, प्रकल्पाचे अपेक्षित खर्च-रु.१०९८६ कोटी, दैनंदिन प्रवासी क्षमता-सन २०२१-२२-८.९० लाख व सन २०३१-३२-१०.४९ लाख, प्रकल्प पूर्णत्वाचा कालावधी मार्च २०२० पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

मेट्रो मार्ग-४ वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली मार्गाची लांबी ३२.३२ किमी असून एकूण स्थानके ३२ आहे. प्रकल्पाचा अपेक्षित खर्च रु.१४.५४९ कोटी आहे. दैनंदिन प्रवासी क्षमता वर्ष २०२१-२२-८.७० लाख, वर्ष २०३१-३२-१२.१३ लाख आहे. प्रकल्प पूर्णत्वाचा कालावधी जुलै २०२१ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

---

## वसई विरार पालिकेने स्वच्छता उपद्रव नियंत्रण करण्याकामी नेमलेल्या क्लीनअप मार्शल विरोधात सातत्याने तक्रारी येत असल्याबाबत

**(४) २९३४८ (२३-१२-२०१५). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई विरार पालिकेने स्वच्छता उपद्रव नियंत्रण करण्याकामी नेमलेल्या क्लीनअप मार्शल विरोधात सातत्याने तक्रारी येत असल्याने व त्यातून काहीच साध्य होत नसल्याने नियुक्त ठेकेदाराचा ठेका रद्द करण्याचा प्रस्ताव तयार केला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील स्वच्छता उपद्रव नियंत्रण करण्यासाठी शासनाने कोणती पर्यायी उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०८-२०१६) :** (१) होय.

नियुक्त ठेकेदाराचा ठेका रद्द करण्याची शिफारस करण्यात आली ही वस्तुस्थिती आहे.
(२) वसई-विरार महानगरपालिकेमार्फत ठेकेदारास वारंवार नोटीसा पारीत करण्यात आलेल्या असून, त्यानुषंगाने सदर ठेकेदारांने त्याच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा केलेली आहे.

सदर ठेकेदाराचा कालावधी संपुष्टात आल्याने पुढील कालावधीसाठी नव्याने निविदा प्रक्रिया पार पाडावयाची असल्याने स्थायी समितीच्या मान्यतेने विद्यमान झेड प्रोटेक्शन सर्विसेस या ठेकेदारांस मुदतवाढ देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अनेक विविध कारणामुळे आगीच्या घटना घडत असल्याबाबत**

**(५) २९९७८ (२१-०१-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेक विविध कारणामुळे आगीच्या घटना घडत असून राज्यात रहिवाशी परिसरात ११५ आगीच्या घटना घडल्या असून त्यामध्ये ११४ नागरिकांना तसेच व्यापारी संकूलात लागलेल्या आगीच्या घटनामध्ये ९ जणांना जीव गमवावा लागला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागरीक रहिवाशी वस्तींपैकी आगीच्या बहुतेक घटना या झोपडपट्टीतील घरगूती गॅस लिकेज, तसेच एकमेकास खेटून असलेल्या झोपडयांमुळे आग पसरणे व आग विझविण्याकरिता आवश्यक साधन सामुग्रीची कमरता यामुळे आगीच्या तीव्रतेत भर पडणे, तसेच सध्याच्या इमारतीची वाढती उंची, काचेची तावदाणे संबंधित मनपा व इतर संस्थाकडे असलेली साधनसामुग्रीची कमतरता यामुळे बहुतेक जीवीत व वित्तहानीच्या घटना वारंवार घडत असतात हे लक्षात घेता या आगीच्या घटना रोखण्याकरिता शासन जनजागृती करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, या मागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०७-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) वाढत्या नगरीकीकरणामुळे शहरी भागात झोपडपट्टीचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे आगीचे धोक्यांमध्ये वाढ होत आहे. दिनांक १४ते २० एप्रिल या कालावधीत राज्यात अग्निशमन सेवा सप्ताह पाळण्यात येतो. या सप्ताहामध्ये राज्यातील अग्निशमन दलांमार्फत आगीच्या धोक्याबाबत जनजागृतीचे विविध कार्यक्रम राबविण्यात येतात. नागरी रहिवासी वस्त्यांमध्ये अग्निशमनाबाबत व्याख्याने, प्रात्यक्षिके आयोजित करण्यात येताना जनजागृतीचे कार्यक्रम सतत राबविण्यात येत असतात. राज्यातील नगरपरिषदांच्या अग्निशमन सेवा सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान अंतर्गत अग्निशमन केंद्र बांधणे व अग्निशमन वाहन खरेदी करणे यासाठी शासनामार्फत सन २००९ पासून अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते. तसेच महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान (जिल्हास्तर) व वित्त आयोमार्फत अग्निशमन

वाहने व उपकरणे खरेदी करण्यासाठी नगरपालिका / नगर पंचायतीना शासन अनुदान देण्यात येते. तसेच महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या कलम ३(३) मालक किंवा भोगवटादाराने आपल्या मालिकाच्या इमारतीमध्ये आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपायोजनांतची तरतुद करणे व सदर यंत्रणा दुरुस्त आणि कार्यक्षम स्थितीत ठेवणे बंधनकारक आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भातील टोलेजंग खाजगी इमारतीचे मालक अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परिक्षण करित नसल्याबाबत

**(६) ३१९७३ (२१-०१-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्थानिक स्वराज्य संस्था आणि विशेष नियोजन प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रातील वर्दळ असणाऱ्या खाजगी इमारतीच्या अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परिक्षण (फायर ऑडिट) दरवर्षी करणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भातील टोलेजंग खाजगी इमारतीचे मालक ऑडिट करीत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नगरपालिका, महानगरपालिकांमध्ये ५०० ते १००० रुपयांचे फायर ऑडिट संदर्भातील ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०७-२०१६) :** (१) शासन परिपत्रक नगर विकास विभाग दि. २५ जून, २०१२ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्था आणि विशेष नियोजन प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रातील वर्दळ असणाऱ्या खाजगी इमारतींच्या भेवटादार / मालक यांनी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवनसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या तरतूदीप्रमाणे अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परिक्षण (फायर ऑडिट) नोंदणीकृत अनुज्ञप्ती धारक अभिकरणांकडून जानेवारी व जुलै असे २ वेळा करुन घेणे बंधनकारक आहे.

(२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या अनुसूची दोन मध्ये दिलेल्या दराप्रमाणे दर आकारुन बहुतांशी नगरपालिका / महानगरपालिकांकडून अग्निशमनाबाबत ना हरकत प्रमाणपत्रे देण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) लागू नाही.

---

**ठाणे महापालिका क्षेत्रात होणा-या पाणी पुरवठ्यासंदर्भातील प्रकल्प अहवाल**

**(७) ३२२६३ (२१-०१-२०१६). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महापालिका क्षेत्रात होणा-या पाणी पुरवठ्यात संदर्भात दिनेश राठी ॲन्ड असोशिएशन यांनी प्रकल्प अहवाल सादर केला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणीपुरवठा यंत्रणेची सुसूत्रता आणण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०८-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) पाणी पुरवठा विभागाकडील पाणी व ऊर्जा लेखा परीक्षणाचे काम दोन टप्प्यात करण्यात आले असून प्रथम टप्पयात वहन व्यवस्थेचे संपूर्ण पाणी व ऊर्जा लेखापरीक्षण करण्यात आले. त्यामधील शिफारशी खालीलप्रमाणे आहेत :-

१) २ द.ल.लि. क्षमतेचा रिसर्क्युलेशन पंप टेमघर येथील जलशुध्दीकरण केंद्र येथे बांधण्यात येऊन ७ ते ८ द.ल.लि. पाणी उपलब्ध झालेले आहे.

२) स्टेम व ठाणे महानगरपालिकेच्या जलवाहिन्या वेगवेगळ्या करण्यात आलेल्या आहेत.

३) सोनाळे येथील दाब विमोचन टाकी (बीपीटी) ची उंची १० मीटरने कमी करुन विजेच्या बिलात बचत करण्यात आली आहे.

४) संपूर्ण पाणी वितरण व्यवस्थेचे लेखा परीक्षण व मुख्य संयोजनावर बल्क मीटर बसविण्यात आलेले आहेत. अशी कार्यवाही करण्यात आली आहे.

तसेच द्वितीय टप्प्यात २४x७ साठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्यात आला आहे. या अहवालावर आर्थिक तरतुदीअभावी कार्यवाही करण्यात आली नाही. तथापि आता कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रथम टप्प्यातील कामे जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेअंतर्गत पूर्ण करणत आली असून, द्वितीय टप्प्यातील कामास आर्थिक तरतूद उपलब्ध न झाल्याने पूर्ण झाली नाही. तथापि त्यातील काही कामांसाठी मा.महासेभेच्या मान्यतेने पुनश्च: स्वारस्य अभिव्यक्ती देकार (EOI) मागविण्यात आल्या आहेत.

---

**सरकारी निवासस्थाने बांधून देणाऱ्या विकासकांना**
**जादा चटई क्षेत्रफळ देण्याचे ठरविल्याबाबत**

**(८) ३३७६३ (२१-०१-२०१६). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सरकारी वसाहतीच्या उभारण्यासाठी स्वतंत्रपणे विकास नियंत्रण नियमावली जारी करणाऱ्या शासनाने खाजगीकरणातून सरकारी निवासस्थाने बांधून देणाऱ्या विकासकांना प्रोत्साहनात्मक जादा चटई क्षेत्रफळ देण्याचे ठरविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर जादा क्षेत्रफळ देण्याचा लाभ कोणकोणत्या विकासकांनी घेतला आहे
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत, तसेच याबाबत सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१६) :** (१) होय.

यासंदर्भात शासनाने दिनांक २.९.२०१५ रोजीच्या अधिसूचनेन्वये बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल मंजूर केलेला आहे.

(२) यासंदर्भात किमान २००० चौ.मी. क्षेत्र व १२.०० मी. रुंद रस्ता असलेल्या खाजगी भूखंडाचे संदर्भात जमीन मालक / विकासकाने शासन व शासनाची प्राधिकरणे तसेच महानगरपालिका कर्मचारी यांची निवासस्थाने उपलब्ध करुन दिल्यास एकंदर ३.०० चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे. तसेच किमान ४००० चौ.मी.क्षेत्र व १८ मी. रुंद रस्ता असलेल्या भूखंडाचे संदर्भात एकंदर ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे. यामध्ये जमीन मालक / विकासकास मुंबई बेट शहरामध्ये ४०% व मुंबई उपनगर क्षेत्रामध्ये ८०% प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक उपलब्ध होतो.

(३) व (४) जादा क्षेत्रफळ देण्यासाठी शासनाचे पुर्वमान्यतेची आवश्यकता नाही. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखालील समितीने अशा प्रस्तावाना मान्यता देणेची तरतूद विनियमामध्ये आहे.

---

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत बिझनेस हब प्रकल्प एमएमआरडीएच्या माध्यमातून राबविण्यात येणार असल्याबाबत

**(९) ३४२४७ (२१-०१-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या कल्याण तालुक्यातील २७ गावातील एक हजार एकर जमिनीवर बिझनेस हब प्रकल्प एमएमआरडीएच्या माध्यमातून राबविण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे स्वरुप काय आहे, तसेच या प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त योजनेची अंमलबजावणीचे काम केंव्हापासून सुरु होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१६) :** (१) कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील २७ गावांच्या अधिसुचित क्षेत्रापैकी १० गावांमधील सुमारे १०८९ हे. आर. क्षेत्राच्या प्रस्तावित ग्रोथ सेंटरच्या विकासासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आहे.

(२) सदर ग्रोथ सेंटरमध्ये कल्याण तालुक्यातील मौजे भोपर, संदप, उसरघर, खारीवली, माणगांव, हेदुटणे, कोळे, काटई, निळजे व घेसर या १० गावांमधील क्षेत्राचा समावेश आहे. या

प्रस्तावित ग्रोथ सेंटरच्या टप्पा १ मधील ३३० हे क्षेत्रावर नगर रचना योजनेच्या माध्यमातून विकास करण्याचे प्रस्तावित आहे. प्रस्तावित ग्रोथ सेंटर हे रस्ता आणि रेल्वे मार्गांनी जोडलेले असून ठाणे शहराच्या हद्दीलगत आहे. या ग्रोथ सेंटरमुळे रोजगार निर्मिती होईल. सदरच्या ग्रोथ सेंटरमध्ये प्रादेशिक स्तरावरील उपक्रम/ कार्ये जसे सामुदायिक सभा व प्रदर्शन केंद्र आणि संस्थात्मक वापर उपलब्ध करुन देता येईल. ग्रोथ सेंटरच्या सुनियोजित विकासामुळे अधिक चांगल्या स्वरुपात पायाभूत सोयी सुविधा निर्माण होऊन या क्षेत्रामध्ये उदयोन्मुख गुणवत्तेस वाव मिळण्यास मदत होईल.

(३) सद्यस्थितीत सदर ग्रोथ सेंटरच्या नियोजनाच्या दृष्टीने त्यासाठी लागणारे सर्वेक्षणे, प्रकल्प अहवाल इत्यादीवर कार्यवाही सुरु आहे. सदर ग्रोथ सेंटरसाठी सद्यस्थितीस नियोजनाच्या टप्प्यात कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील गृहनिर्माण प्रकल्पासाठी लागणाऱ्या परवानग्यांच्या पध्दतीत सुलभीकरण आणि कर प्रणालीबाबत विचारविनिमय करण्याबाबत

**(१०) ३४३१० (२१-०१-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गृहनिर्माण प्रकल्पासाठी लागणाऱ्या परवानग्यांच्या पध्दतीत सुलभीकरण आणि कर प्रणालीबाबत विचारविनिमय करण्यासाठी नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्याच्या प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी समिती केली आहे काय, या समितीचा अहवाल प्राप्त होण्यासाठी किती कालावधी लागणार आहे,

(३) अद्यापही यासाठी समिती नियुक्त केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१६) :** (१) व (२) नागरी भागातील विकास सुसाध्य करण्याच्या दृष्टीकोनातून अस्तीत्वातील कायद्यामध्ये, विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अथवा प्रक्रियेमध्ये बदल करणे आवश्यक असल्यास त्याबाबतच्या शिफारशी शासनास करण्यासाठी शासनाने प्रधान सचिव (नवि-१) यांचे अध्यक्षतेखाली दि. १८/११/२०१५ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत केली असून समितीकडून सदर बाबतीत पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपुरी नगरपरिषद क्षेत्रामध्ये रस्ते दुरुस्ती, रस्ते बांधणीसाठी विशेष रस्ते अनुदान मिळण्याबाबत

**(११) ३४७१३ (२१-०१-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपुरी नगरपरिषद क्षेत्रामध्ये रस्ते दुरुस्ती, रस्ते बांधणीसाठी विशेष रस्ते अनुदान कामाच्या प्रस्तावास जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी तांत्रिक मान्यता देऊन कार्या १०/नविशा/अ.का./कावी २०१५/१४०९ नुसार दिनांक २२/९/२०१५ रोजी नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडे अंतिम मंजुरी आणि निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव पाठविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ब्रम्हपुरी नगरपरिषद क्षेत्रामध्ये रस्ते दुरुस्ती, रस्ते बांधणीसाठी विशेष रस्ते अनुदान मिळण्याबाबतचे निवेदन माहे जून २०१५ च्या सुमारास लोकप्रतिनिधीनी मा. मुख्यमंत्री यांना दिले होते, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०१६) :** (१), (२) व (३) होय, ब्रम्हपूरी नगरपरिषद, जि.चंद्रपूर यास रस्ता अनुदान अंतर्गत रु.२.३५ कोटी व विशेष,अनुदान म्हणून रु.५ कोटी सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाकरीता वितरीत करण्यात आला आहे. विशेष रस्ता निधीच्या अनुषंगाने प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली मिरज व कुपवाड महानगरपालिकेच्या सन २००२ पासूनच्या लेखा परिक्षण अहवालावर कारवाई न झाल्याबाबत

**(१२) ३५२८६ (२१-०१-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली मिरज व कुपवाड महानगरपालिकेच्या सन २००२ ते २०१२ पर्यंतच्या लेखा परिक्षण अहवालावर अद्याप कारवाई झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, या अहवालामधून ६५० कोटी रुपयांच्या गैरकारभारांची प्रकरणे बाहेर येऊनही अद्याप काहीही कारवाई झाली नाही, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, लेखा परिक्षण अहवालाचे अनुपालन तीन महिन्यात करावयाचे असूनही अद्याप महापालिकेने अनुपालन केले नाही, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने यासंदर्भात काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०१६) :** (१), (२), (३), (४) व (५) सांगली मिरज व कुपवाड महानगरपालिकेला विशेष लेखापरिक्षण करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राजापूर नगरपरिषदेने शहरातील नदीपात्रांमध्ये ठिकठिकाणी बांधलेल्या फिल्टर टँकमधून घाणीचे व दुर्गंधीचे साम्राज्य पसरल्याबाबत**

**(१३) ३५२९३ (२१-०१-२०१६). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर शहरातील (जि.रत्नागिरी) गटारातील पाणी शुध्द करण्यासाठी राजापूर नगरपरिषदेने शहरातील नदीपात्रांमध्ये ठिकठिकाणी बांधलेल्या फिल्टर टँकमधून घाणीचे व दुर्गंधीचे साम्राज्य पसरल्याचे नुकतेच माहे जून,२०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त फिटर टँकमधून पाणी शुध्द होत नसल्याच्या तक्रारी नगराध्यक्षांना प्राप्त झाल्या आहेत हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, गटाराच्या पाण्यामुळे परिसरात आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कामाची सखोल चौकशी करण्याची मागणी सर्व स्तरावरुन होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
तसेच दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
याबाबत १ तक्रार प्राप्त झालेली होती. सदर तक्रारींचे निवारण करण्यात आलेले आहे.
(३), (४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगली, मिरज व कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांच्या सर्वेक्षणातून सुमारे २५ ते ३० टक्के मालमत्तांना घरपट्टीची आकारणी करण्यात आली नसल्याबाबत**

**(१४) ३५८१५ (२१-०१-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली, मिरज व कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांच्या सर्वेक्षणातून सुमारे २५ ते ३० टक्के मालमत्तांना घरपट्टीची आकारणी करण्यात आली नसल्याची बाब माहे ऑगष्ट २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यावसायिक वापराच्या हॉटेल, दवाखाने, दुकान गाळे आदी  अनेक इमारतींना घरगुती दराने घरपट्टीची आकारणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच विनापरवाना बांधकाम असलेल्या घरांना दंडासह तीनपट जादा आकारणी न करता नियमित आकारणी केली आहे व ७० % पेक्षा जास्त घरांची  मुल्यांकणे, मापे चुकीची, कमी दाखवून कमीत कमी घरपट्टी आकारणी केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या सर्व प्रकरणांची चौकशी होऊन दोषी अधिकाऱ्यांवरती कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) गुंठेवारी क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्रातील विनापरवाना बांधकाम केलेल्या इमारतींना दुप्पट शास्तीसह कर आकारणी करणेत आली आहे.
तसेच ७०% पेक्षा जास्त घरांची मुल्यांकने, मापे, चुकीची, मी दाखवून कमीत कमी घरपट्टी आकारणी केली हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) येथील नगरपंचायत हद्दीतील नळपाणी पुरवठा योजना जुनी झाल्याबाबत

**(१५)  ३५९१९ (२१-०१-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) येथील नगरपंचायत हद्दीतील नळपाणी पुरवठा योजना जुनी झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास शहरातील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने नवीन नळपाणी पुरवठा योजना राबविण्यात यावी अशी मागणी तेथील जनतेनी तसेच लोकप्रतिनिधींनी त्याचप्रमाणे नगरपंचायत शहापूर यांनी शासनाकडे गेली दोन वर्षापासून सतत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(५) असल्यास, नवीन नळपाणी पुरवठा योजना राबविण्याबाबत कोणती तातडीची कार्यवाही करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) शहापूर नगरपंचायत नविन पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अमृत योजने अंतर्गत राबविण्यात येणार असून शहापूर नगरपंचायत हद्दीत वाढत्या नागरीकरणांच्या दृष्टीकोनातून सदर योजनेचा आराखडा तयार करण्यात येणार आहे.

शहापूर नगरपंचायत नव्याने प्रस्थापित झाली असून नवीन पाणी पुरवठा योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरातील विकास कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(१६) ३८४९० (२३-१२-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महानगरपालिकेला विकास कामाकरिता गत पाच वर्षात सुमारे एक हजार कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका प्रशासनाने श्री.महालक्ष्मी तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करण्यात आला असून सदरहू आराखडा ११० कोटीवरुन १९० कोटीचा त्यानंतर पुन्हा २५५ कोटीचा करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर शहराच्या विकासासाठी भरघोस निधी वितरीत करुनही विकास कामे प्रलंबित असण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०१६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे,

मागील पाच वर्षात विविध विकास कामांसाठी कोल्हापूर महानगरपालिकेस रु.५०४ कोटी निधी प्राप्त झाले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) कोल्हापूर महानगरपालिकेस विविध विकास कामांसाठी शासकीय अनुदानातुन रु.५०४ कोटीचा निधी उपलबध झालेला असून सदर निधीमधून बहुतांश कामे पुर्ण झाली असून उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिपळूण (जि.रत्नागिरी) शहरातील बाजारपेठेत**
**होणारी वाहतुकीची कोंडी दूर करण्याबाबत**

**(१७) ३८६८७ (२१-०१-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) शहरातील बाजारपेठेत होणारी वाहतुकीची कोंडी दूर करण्याच्या दृष्टीने नगरपरिषद प्रशासनाने सुमारे आठ वर्षापूर्वी रस्ता रुंदीकरणाचा प्रस्ताव तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आठ वर्षापूर्वी प्रस्ताव तयार करूनही अद्याप सदर रस्त्याचे रुंदीकरण करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याचे रुंदीकरणाचे काम प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास,शहरातील वाहतुकीची कोंडी टाळणेच्या दृष्टीने सदर रस्त्यांचे रुंदीकरण करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०१६) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) नगरपरिषदेने सुमारे १० वर्षापूर्वी चिपळूण बाजारपेठ भागामध्ये मुख्य बाजारपेठ रस्त्याला समान अंतरामध्ये चिपळूण अर्बन बँक ते भेंडीनाका पर्यंत बायपास रस्ता केलेला आहे. तसेच वाहतूक पोलिस व चिपळूण नगरपरिषद यांचे संयुक्त कार्यवाहीने मुख्य बाजारपेठ रस्त्यामध्ये सम व विषम तारखेना रस्त्याच्या बाजूला पट्टे मारुन टू व्हिलरसाठी पार्किंग व्यवस्था केलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिपळूण नगरपरिषदेच्या (जि.रत्नागिरी) अखत्यारीत असलेले**
**शहरातील रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याबाबत**

**(१८) ३८७१२ (२१-०१-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण नगरपरिषदेच्या (जि.रत्नागिरी) अखत्यारीत असलेले शहरातील रस्त्यांची दुरवस्था झाली असून सदर रस्त्यांचे डांबरीकरण होणेबाबत नागरिकांकडून मागणी होत आहे , हे खरे आहे काय,
(२) असल्यास,शहरातील मुरादपूर , शंकरवाडी , महाराष्ट्र हायस्कूल मार्गे जाणारा रस्ता आदी रस्ते नादुरुस्त असून विशेषतः रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्याचीही प्रचंड दुरवस्था आहे , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्यांची सुधारणा व डांबरीकरण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) चिपळून नगरपरिषदेच्या (जि.रत्नागिरी) अखत्यारीत असलेले शहरातील प्रमुख १ ते ११ रस्ते डांबरीकरण करणे कामी रक्कम रु. २,५७,८८,०६०/- मात्रचे खर्चास तांत्रिक मंजूरी घेण्यात आली. दिनांक २२.०२.२०१६ अन्वये जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे जिल्हा नगरोत्थान योनजेंतर्गत निधी मिळणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

तथापि सदर प्रस्तावास जिल्हा नगरोत्थान अंतर्गत निधी मंजूर झालेला नसल्याने सदरची कामे नगरपरिषद निधीतून हाती घेणेबाबत दि. ०७.०४.२०१६ ते १३.०४.२०१६ या कालावधीत ई- निविदा प्रसिध्द केली व त्यानूसार प्राप्त ठरलेल्या कंत्राटदारास दि. २०.०६.२०१६ रोजी वाटाघाटासाठी बोलावण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाण्यात विकासकाने ५ हजार झाडांची कत्तल केल्याबाबत**

**(१९) ३९४४६ (२१-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे बाळकुम (ठाणे) येथील क्लेरीयंट कंपनीच्या विकास प्रस्तावाला अनुसरुन, इमारतीचे बांधकाम नकाशे मंजूर करण्यात आले असून, सदर प्रस्तावाअंतर्गत विकासकाने महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता सुमारे ५ हजार झाडांची कत्तल केल्याची तक्रार येथील लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास मा. पर्यावरण मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चोकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित विकासकावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०८-२०१६) :** (१) लोकप्रतिनिधींकडून अशी तक्रार मा.पर्यावरण मंत्री यांचे कडे केली होती.
(२) सक्षम प्राधिकरणाने विहित कार्यपध्दतीनुसार परवानगी देण्यात आलेली असल्याने चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण - डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील महापालिकेच्या ताब्यात असलेल्या आरक्षित भूखंडावरील केलेल्या कार्यवाहीबाबत**

**(२०) ४०६२० (१३-०५-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण - डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या आरक्षित भूखंडावर आयुक्तांनी दिनांक ०४ जानेवारी २०१६ मध्ये वा त्या सुमारास धडक कार्यवाही करून भूखंड ताब्यात घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,आरक्षित भूखंडावर गेल्या २० वर्षापासून उभ्या राहिलेल्या इमारती, झोपड्यांवर देखील कार्यवाही करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर इमारती, झोपड्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या पुनर्वसनाबाबत महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०८-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या आरक्षित भूखंडांवर बेकायदेशीररित्या अतिक्रमण झाल्यास महानगरपालिकेकडून वेळोवेळी निष्कासनाची कारवाई करण्यात येत असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगपालिका यांनी कळविले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण - डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये आयरे, भोपर विभागात मोठ्या प्रमाणावर दररोज पाण्याची चोरी होत असल्याबाबत**

**(२१) ४०६४६ (१३-०५-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण - डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामधील आयरे, भोपर विभागामध्ये ज्योतीनगर झोपडपट्टीतील रहिवाश्यांच्या अधिकृत नळ जोडण्या तोडण्यात आल्या आहेत मात्र आजूबाजूच्या झोपडपट्टीतील बेकायदा नळ जोडण्यांवर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात न आल्याची तक्रार मा. मुख्यमंत्र्यांकडे दिनांक १० जानेवारी २०१६ रोजी वा त्या सुमारास करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोठ्या प्रमाणावर पाणी चोरी होवून कल्याण तालुक्याला पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने बेकायदा नळ जोडण्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०८-२०१६) :** (१) अशा आशयाची तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) हे खरे नाही.
(३) आयरे, भोपर विभागातील ज्योतीनगर परिसरास ज्या जुन्या जलवाहिनीद्वारे पाणी पुरवठा होत होता. त्या जलवाहिनीवर अनधिकृत नळजोडणी धारकांनी नळजोडण्या करुन घेतल्याने ही जलवाहिनी महानगरपालिकेकडून बंद करण्यात आली. तद्नंतर याठिकाणी महानगरपालिकेडून नवीन १०० मी.मी. व्यासाची डी.आय.जलवाहिनी टाकण्यात आली असून त्याद्वारे अधिकृत नळजोडण्या देण्यात येवून पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.

याखेरीज ज्यांच्याकडे अधिकृत नळजोडण्या नाहीत, अशांसाठी आयरे गाव जलकुंभ येथे ५००० लिटर क्षमतेच्या २ सिन्टेक्स टाक्या बसवून त्याद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण - डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये खासगीकरणाच्या माध्यमातून परिवहन डेपो विकसित करण्यात येणार असल्याबाबत**

**(२२) ४०८३५ (१७-०५-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील परिवहन डेपो पीपीपी आणि बिओटी तत्वावर विकसित करण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेने दिनांक ०२ जानेवारी २०१६ रोजी वा त्या सुमारास केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,यातून कोणकोणते परिवहन डेपो विकसित करण्यात येणार आहेत व किती परिवहन डेपो विकसित करण्यात आले आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०८-२०१६) :** (१) व (२) कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमासाठी आरक्षित भुखंड विकसित करण्याकरिता महानगरपालिकेडून सन २०१४-१५ मध्ये निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. मात्र या निविदा प्रक्रियेस समाधानकारक प्रतिसाद मिळाला नाही.

या पार्श्वभूमीवर वसंत व्हॅली आगार, गणेशघाट आगार, खंबाळपाडा आगार आणि काटेमानिवली आगार या आगारांच्या विकासासाठी पहिल्या टप्प्यात प्राथमिक पायाभूत सुविधाप उपलब्ध करुन देण्याबाबतच्या प्रस्तावास महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने दि. २९/०२/२०१६ रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार या कामांकरीता महानगरपालिकेकडून निविदा प्रक्रिया राबविण्याचे प्रस्तावित आहे.

प्राथमिक पायाभूत सुविधाव्यतिरिक्त या आगारांच्या उभारणीबाबतची उर्वरित कामे महानगरपालिका निधी/ बांधा, वापरा व हस्तांतरीत करा/सार्वजनिक - खाजगी भागिदारी / राज्य- केंद्र शासन पुरस्कृत योजना इत्यादीच्या माध्यमातून करण्याबाबत महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्यात येत असल्याचे आयुक्त, कल्याण - डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### लातूर जिल्हयातील दुष्काळी भागात मजुरांना वाढीव तरतूद देणेबाबत

**(२३) ४१४२२ (१३-०५-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील दुष्काळग्रस्त परिस्थितीमुळे सहाय्यक कामगार आयुक्तांकडे विविध उपाययोजनेअंतर्गत मजुरांसाठी सुमारे ५ कोटी रुपये निधीची मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीचा पाठपुरावा करता शासनाने केवळ ९१ लाख ३२ हजार रुपयांचा निधी देऊ केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, लातूरमधील नोंदणीकृत मजुरांपैकी सुमारे ५ हजार ६८९ मजुरांनी आर्थिक सहाय्य मिळावे यासाठी माहे एप्रिल ते सप्टेंबर २०१६ महिन्यात अर्ज केले तर शासनाने देऊ केलेला निधी केवळ ९३६ मजुरांना पुरणार असल्याने जिल्हयातील दुष्काळग्रस्त परिस्थितीचा विचार करता प्रलंबित निधी देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२२-०८-२०१६) :** (१) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत पात्र बांधकाम कामगारांकरिता विविध कल्याणकारी योजनेचा लाभ देण्याकरिता दिनांक ११.५.२०१५ रोजी रु.९१,३२,०००/- व दिनांक ४.११.२०१५ रोजी रु.५,३१,८२,६००/- इतक्या रकमेची मागणी इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्याकडे केली आहे.

तथापि, ही मागणी नियमित स्वरुपाची असून जिल्हयातील दुष्काळग्रस्त परिस्थितीमुळे केली होती हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) लातूर जिल्हयातील बांधकाम कामगारांची नोंदणी व त्यांना वाटप करण्यात आलेल्या अर्थ सहाय्यामध्ये गंभीर अनियमितता झाल्याबाबत प्राप्त झालेली तक्रार विचारात घेऊन, सदरचा निधी वितरीत करण्यात आलेला नाही. तथपि, बांधकाम कामगारांच्या मागील नोंदणीची वैधता पडताळणी चालू असून पडताळणीअंती, सुधारित मागणी आल्यानंतर मंडळाकडून निधी उपलबध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ठाणे जिल्हयातील कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाचे नुतनीकरण व इतर बांधकामाबाबत

**(२४) ४१९३४ (०३-०५-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाचे नुतनीकरण तात्काळ पूर्ण करण्यात यावे, तसेच दत्तवाडी येथील मिसिंग लिंक रोड बनविणे, खारेगाव

मधून नाशिक महामार्गाला जोडणारा रस्ता तात्काळ तयार करण्याचे आदेश आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी दिनांक २१ जानेवारी, २०१६ रोजी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०८-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अ) छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाबाबत :-
कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या नुतनीकरण करणे अंतर्गत विविध प्रस्तावाअंतर्गत स्वतंत्र कामे सुरु करण्यात आलेली आहेत.
ब) दत्तवाडी येथील मिसिंग लिंक रोड बनविणे बाबत :-
सदरचे काम प्रगतीपथावर आहे.
क) खारेगाव मधून नाशिक महामार्गाला जोडणाऱ्या रस्त्याबाबत :-
सदर प्रकरणी नियोजित रस्त्याखालील जमिनीचे भूसंपादन करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मनमाड (जि. नाशिक) नगरपरिषदेतील एकूण २४४ सफाई कामगारांच्या आरोग्याबाबत**

**(२५) ४२९१३ (०३-०५-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मनमाड (जि. नाशिक) नगरपरिषदेतील एकूण २४४ सफाई कामगारांची संख्या असतानाही शहरात जवळपास सर्वच भागांमध्ये कचरा आणि घाणीचे ढीग,तुंबलेल्या गटारी, शौचालयात पसरलेली दुर्गंधी आदींमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे डिसेंबर,२०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही सफाई कामगार हे ऑफिसमध्ये काम करीत असल्याने शहराची साफसफाई करण्यासाठी मोजकेच कामगार असणे, परंतु त्यांना गेल्या अनेक वर्षापासून गमबूट, हँडग्लोज, तोंडाला बांधण्यासाठी मास्क नसल्याने सदरील कामगार हे हातात आणि पायात प्लास्टिकच्या पिशव्या व तोंडाला कपडा बांधून काम करीत असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील कामगारांच्या आरोग्यबाबत पालिका प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने सफाई कामगारांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०७-२०१६) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील घनकचरा व्यवस्थापन विभागातील सफाई कामगारांचे हजेरी पट तपासण्याचे काम तीन महिन्यापूर्वी मृत झालेल्या कनिष्ट अभियंत्याकडे सोपविल्याबाबत**

**(२६) ४४६७९ (१३-०५-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण डोंबिवली महापालिकेतील घनकचरा व्यवस्थापन विभागातील सफाई कामगारांचे हजेरी पट तपासण्याचे काम तीन महिन्यापूर्वी मृत झालेल्या कनिष्ट अभियंत्याकडे सोपविल्याबाबतचे आदेश महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाने काढल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास काढल्याचे निदर्शनास आले, हे खरेआहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार मृत कनिष्ठ अभियंत्याकडे तपासणी करण्याचे काम सोपविणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०८-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) दिनांक १३/०१/२०१६ रोजी दि. २२ ते २८ जानेवारी या कालावधीत हजेरीशेड तपासणीकरीता आदेश निर्गमित करताना त्या आदेशात सॅप प्रणालीतून नाव न वगळण्यात आलेल्या व काही महिन्यापूर्वी दिवंगत झालेल्या महानगरपालिकेतील कनिष्ठ अभियंता यांचे नाव अनावधानाने समाविष्ट करण्यात आले.
मात्र सदर चूक निदर्शनास येताच महानगरपालिकेकडून त्याच दिवशी तासाभरात सुधारित आदेश निर्गमित करण्यात आल्याचे व संबंधित लिपिकाची पालिकेच्या सामान्य प्रशासन विभागातून अन्यत्र बदली करण्यात आल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील तिसगांव येथील अनधिकृत बांधकामाबाबत**

**(२७) ४५६२८ (०५-०५-२०१६). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. ४९९/सर्व्हे नं.७३ तिसगांव येथील अनधिकृत बांधकाम निष्कासीत करुन भूखंड विकसीत करण्याबाबतचे निवेदन आयुक्त कल्याण-डोंबिवली महापालिका यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३ नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निवेदने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०८-२०१६) :** (१) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सर्व्हे क्र. ७३ मधील आरक्षण क्र. ४४९ बाबत आयुक्त, कल्याण-डोंबिवली महापालिका यांना निवेदन दिले आहे.
(२) सर्व्हे क्र. २७/ब मधील कचोरे येथील आरक्षण क्र. ४९९ हे "दुकान केंद्र" यासाठी आरक्षित असून ही जागा मोकळी आहे.

सर्व्हे क्र. ७३/अ मधील तिसगाव येथील आरक्षण क्र. ४४९ हे "बगीचा" या प्रयोजनासाठी आरक्षित असून हा भुखंड खाजगी मालकी हक्काचा आहे. हा आरक्षित भुखंड महानगरपालिकेस अद्याप हस्तांतरीत झालेला नाही. मात्र या आरक्षणावर झालेल्या अतिक्रमणाबाबत महानगरपालिकेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार कायदेशीर कार्यवाही पूर्ण करण्यात आलेली आहे.

सदर आरक्षित भुखंडावरील काही अनिधकृत बांधकामे बांधकामधारकांनी स्वत:हून काढून घेतली आहेत. तार उर्वरित घरांमध्ये रहिवास असल्याने ही बांधकामे पावसाळ्यानंतर निष्कासित करण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिकेकडून प्रस्तावित आहे. तसेच हा आरक्षित भुखंड विहित प्रक्रिया राबवून ताब्यात घेण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही करण्याची तजवीज ठेवण्यात आली असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या परिवहन विभागातील व्यवहाराबाबत**

**(२८) ४५६५९ (१३-०५-२०१६). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या परिवहन विभागाला भांडवली आणि महसुली खर्चासाठी १९१ कोटी ४१ लाख रुपये अपेक्षित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नव्याने दाखल झालेल्या परिवहनच्या तब्बल ७० बसेस चालकांअभावी सहा महिन्यांपासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०८-२०१६) :** (१) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या परिवहन प्रशासनाने महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाकरीता सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील महसूली आणि भांडवली खर्चासाठी रु. १९१ कोटी ६४ लाख १० हजार एवढ्या रकमेचे अंदाजपत्रक परिवहन समितीस मान्यतेसाठी सादर केले होते. परिवहन समितीने या अंदाजपत्रकात वाढ करुन रु. १९३.२० कोटी एवढ्या रकमेचे अंदाजपत्रक महानगरपालिकेच्या

स्थायी समितीस सादर केले असता, स्थायी समितीने या अंदाजपत्रकामध्ये बदल करुन रु. १५१.७० कोटी एवढ्या रकमेचे अंदाजपत्रक मंजूर केले.

तद्नंतर हे अंदाजपत्रक महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस सादर केले असता, सर्वसाधारण सभेने त्यात रु. २ कोटी एवढी वाढ करुन रु. १५३.७० कोटी इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास मान्यता दिली आहे.

(२) व (३) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाकरीता १८५ बसेसे मंजूर झाल्या असून त्यापैकी १० वातानुकूलित बसेस नियमित वेळापत्रकानुसार चालविण्यात येत आहेत.

उर्वरित ६० बसेस बाह्य यंत्रणेमार्फत चालविण्याकरीता प्रयत्न करुनही प्रतिसाद न मिळाल्याने या बसेस परिवहन सेवेकडील उपलब्ध कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून आळीपाळीने चालविण्यात येत आहेत.

या बसेस बाह्य सहाय्यीत यंत्रणेमार्फत चालविण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेडून निविदा प्रक्रिया राबविण्यात येत असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील कल्याण (पुर्व) येथील निर्मल स्वच्छता अभियानाअंतर्गत बांधण्यात आलेल्या शौचालयांस वीज व पाणी पुरवठाबाबत**

**(२९) ४५७६५ (१३-०५-२०१६). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील कल्याण पुर्वतील निर्मल स्वच्छता अभियानाअंतर्गत बांधण्यात आलेल्या शौचालयांच्या दुरावस्था दुर करणे तसेच शौचालयाची विद्यमान व्यवस्थापक मंडळे बदलून त्यांचेकडून पाणी बिले व विद्युत बिलांची थकबाकी वसुल करणे तसेच यापुढे शौचालयांना मोफत विद्यृत व पाणी पुरवठा करण्याबाबतचे निवेदन मा.आयुक्त, कल्याण-डोंबिवली महापालिका यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३ जानेवारी, २०१४ पासून ते आज रोजी पर्यंत ४ स्मरण पत्र दिले आहेत,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करणार आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) निर्मल स्वच्छता अभियानाअंतर्गत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण पुर्व भागात बांधण्यात आलेल्या एकूण १८ शौचालयांची दुरुस्ती महागनरपालिकेकडून करण्यात आली आहे.

याखेरीज या शौचालयांची दैनंदिन साफसफाई, देखभाल, दुरुस्ती व निगा राखण्यासाठी विहित अटी व शर्तीनुसार कंत्राटदारांची नेमणूक करण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिकेडून करण्यात येत आहे.

कंत्राटदारांची नियुक्त केल्यानंतर उक्त शौचालयांना विद्युत व पाणी पुरवठा महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भगुर (जि.नाशिक) येथील संताजी मंगल कार्यालयासमोरील पाण्याची टाकीची दुरुस्तीबाबत**

**(३०) ४६६३४ (१७-०५-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भगुर (जि.नाशिक) येथील संताजी मंगल कार्यालयासमोरील पाण्याची टाकी धोकादायक झाली असून ती केव्हाही कोसळण्याच्या स्थिती असल्याने या टाकीची दुरुस्ती करण्याची मागणी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांच्याकडे दिनांक २४ डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास स्थानिकांनी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पाण्याच्या टाकीची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०७-२०१६) :** (१) होय.
(२) पाण्याच्या टाकीची दुरुस्ती करण्यासाठीची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक येथील औदयोगिक पशिक्षण संस्था ते खुटवडनगर-शिवशक्ती-त्रिमुती चौक रस्त्यावर असलेल्या नाल्यावरील पुलाचे विस्तारीकरण करणेबाबत**

**(३१) ४७३७५ (१६-०५-२०१६). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील औदयोगिक प्रशिक्षण संस्था ते खुटवडनगर-शिवशक्ती-त्रिमुती चौक रस्त्यावर असलेल्या नाल्यावरील पुलाचे विस्तारीकरण करणेबाबत जिल्हाधिकारी, नाशिक, आयुक्त महानगरपालिका, नाशिक व शहर अभियंता, नाशिक महानगरपालिका,नाशिक यांना लेखी निवेदन दिनांक १ डिसेंबर,२०१५ रोजी देऊन या कामास निधीसह प्रशासकीय मान्यता देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर पुलाचे विस्तारीकरणाचे संकल्पचित्र तयार करण्यासाठी महानगरपालिका पॅनलवरील स्ट्रक्चरल डीझाईनर यांचेकडून कार्यवाही सुरु आहे. सदर कामास आर्थिक तरतूद उपलब्ध झाल्यानंतर कामाच्या खर्चास मंजुरी घेऊन पुलाचे विस्तारीकरण करण्याचे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सेलू नगर परिषद (जि.परभणी) वसंतराव खारकर कॉम्प्लेक्समधील सुसज्ज हॉल नगरपरिषदेकडे वर्ग करण्याबाबत

**(३२) ४७९९८ (०५-०५-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू नगर परिषदचे (जि.परभणी) तत्कालीन नगराध्यक्ष व विद्यमान नगराध्यक्ष यांनी पालिकेच्या मालकीच्या वसंतराव खारकर कॉम्प्लेक्समधील सुसज्ज हॉलचा गैरवापर केल्याने सदर हॉल नगरपरिषदेकडे वर्ग करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३ फ्रेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०७-२०१६) :** (१) होय.

(२) जिल्हाधिकारी, परभणी यांनी दि.२८.०३.२०१६ रोजी नगरपरिषद सेलू यांच्या मालकीच्या वसंतराव खारकर कॉम्प्लेक्समधील गाळा क्र.९ ते १४ वरील जागा मुख्य कार्यकारी अधिकारी साईबाबा नागरी सहकारी बँक म.सेलू यांना भाडेतत्वावर देण्याची कार्यवाही बेकायदेशीर असल्याने जागा भाडे तत्वावर देण्याबाबतच्या आदेशाला स्थगिती देवून जागा बँकेकडून नगरपरिषदेकडे वर्ग करण्याचे आदेशीत केले आहे.

यापकरणी नगरपरिषदेच्या विशेष सभेच्या मंजूर ठरावानुसार दि.१८.०४.२०१६ रोजी विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद संचालनालय, औरंगाबाद यांच्या कडे अपिल दाखल करण्यात आले आहे व सदरचे अपिल प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलातील भूखंडावर इंटरनॅशनल फायनान्स सर्व्हिस सेंटर सुरु करण्याबाबत

**(३३) ४८७४१ (३०-०४-२०१६).प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जागतक दर्जाच्या वित्तीय संस्थांना करसवलत देऊन व्यवसायासाठी आकर्षित करण्यासाठी फायनान्स सेंटर उभारले जाते व जागतिक बँकेने दिलेल्या अहवालानुसार मुंबई हे असे सेंटर होण्यास सर्वाधिक योग्य क्षेत्र आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त सूत्रानुसार व अहवालानुसार मुंबईतील वांद्र-कुर्ला संकुलातील भूखंडावर इंटरनॅशनल फायनान्स सर्व्हिस सेंटर सुरु करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचारधीन असून त्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे परवानगी मागितलेली असून यासंदर्भात मा. केंद्रीय वित्त राज्यमंत्री यांच्यासमवेत दिनांक १ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास बैठक आयोजित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाचे स्वरुप काय असून यासंदर्भातील सद्य:स्थिती काय आहे व हा प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१६) :** (१) व (२) दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या बैठकीत बांद्रा कुर्ला संकुलामध्ये जागतिक वित्तीय सेवा केंद्रासाठी (IFSC) सुमारे २० हेक्टर भूखंड राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

केंद्र शासनास वांद्रा-कुर्ला संकुलातील G-Text Block ला विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) म्हणून घोषित करण्यास व त्यामध्ये "जागतिक वित्तीय सेवा केंद्र" (IFSC) स्थापन करण्यासंबंधी सप्टेंबर, २०१५ मध्ये विनंती केली आहे.

बांद्रा - कुर्ला संकुलामध्ये "जागतिक वित्तीय सेवा केंद्र" स्थापन करण्यासाठी तसेच हा प्रकल्प कार्यान्वित होण्यासाठी लागणाऱ्या मार्गदर्शक, समन्वय व इतर सर्व बाबींबाबत दिनांक ०३ डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयानुसार टास्क फोर्स ची स्थापना केली असून या टास्क फोर्सची पहिली बैठक मा.केंद्रीय वित्त राज्य मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १ फेब्रुवारी, २०१६ रोजी संपन्न झाली.

(३) वांद्रा-कुर्ला संकुलातील "जी" ब्लॉक वित्तीय केंद्र म्हणून विकसित झाला आहे व त्यास पूरक असे वांद्रे-कुर्ला संकुलात "जी-टेक्स" ब्लॉकमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मोठ्या वित्तीय कंपन्यांची कार्यालये स्थापित करुन हे क्षेत्र "जागतिक वित्तीय सेवा केंद्र" (IFSC) म्हणून विकसित केल्याने विकास तर होईलच शिवाय आंतरराष्ट्रीय वित्तीय व्यवहार (Transaction) मुंबईत सुरु झाल्यावर राज्याला मोठ्या प्रमाणात उत्पन्न देखील प्राप्त होईल अशी अपेक्षा आहे. बांद्रा-कुर्ला संकुलात "जागतिक वित्तीय सेवा केंद्र" स्थापनेचा बृहत आराखडा तयार करणे तसेच हा प्रकल्प राबविण्याबाबतची अंमलबजावणी धोरण निश्चित करण्याबाबत सल्लागाराची नेमणूक करण्याची निविदा प्रक्रियेस सुरुवात केली असून सल्लागारांकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

### अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील मोकळ्या जागेवर अतिक्रमण झाल्याबाबत

**(३४) ४९०५१ (१६-०५-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या अखत्यारीत मोकळ्या जागेवर मोठया प्रमाणात अतिक्रमण झाल्याची बाबत माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अतिक्रमण हटविण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.

तथापि, अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील मौजे रहाटगाव स.क्र. ११७, मौजा नवसारी स.क्र. २९ व नझुल शिट क्र. K बिच्छु टेकडी येथील शासकीय जमीवरील अतिक्रमण काढण्यास महापालिकेने महसूल विभागास आवश्यक ती मदत केलेली आहे.

(२) व (३) अभिन्यासामधील सार्वजनिक वापराच्या जागा, महानगरपालिकेच्या मालकीच्या जागा, रस्ते इ. वर कलेले अतिक्रमणे महापालिकेकडून वेळोवेळी निष्काषीत केली जातात.

---

### मुंबई शहराच्या प्रस्तावित नविन विकास आराखड्यात शहरातील गत १० वर्षात तयार करण्यात आलेलेल्या रोड लाईन्सचा समावेश करण्याबाबत

**(३५) ४९३४१ (१७-०५-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराच्या प्रस्तावित नविन विकास आराखड्यात शहरातील गत १० वर्षात तयार करण्यात आलेल्या रोड लाईन्सच्या समावेश करण्यात आला नसल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, तदनुसार प्रस्तावित नवीन विकास आराखड्यात शहरातील गत १० वर्षात तयार करण्यात आलेल्या रोडलाईन्सचा समावेश करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, सदरहू रोडलाईन्सचा प्रस्तावित विकास आराखड्यात समावेश न करण्यामागची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१६) :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेचा प्रारुप विकास आराखडा (२०३४) हा सुधारित करुन दि. २७/५/२०१६ रोजी हरकती / सूचना प्राप्त करण्यासाठी प्रसिध्द केलेला आहे. सदर आराखड्यामध्ये महापालिका अधिनियम मधील कलम २९१ (नविन सार्वजनिक रस्ता) व कलम २९७(१) (विद्यमान रस्त्याची मंजूर मार्गरेषा) इत्यादी

तरतूदी अन्वये नियोजित करुन महापालिकेची मंजूरी करुन तयार करण्यात आलेल्या असल्यामुळे सदर रोड लाईन्स (रस्त्यांची विहित रेषा) यांचा अंतर्भाव प्रारुप विकास आराखड्यात करण्यात आला नाही.

सदर आराखड्यात हा अंतिम आराखडा नसून म.प्रा.व न.र. अधिनियमाचे कलम २६ अन्वये दि. २७/०५/२०१६ रोजी प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास योजनेसंबंधी हरकती / सूचना मागविण्यात आल्या असून प्राप्त होणाऱ्या हरकत / सूचना पत्रांवर संबंधितांना कलम २८(२) अन्वये गठीत नियोजन समितीमार्फत सुनावणी देण्यात येणार आहे. म.प्रा.व न.र. अधिनियमाचे तरतुदीनुसार पुढील वैधानिक कार्यवाही करण्याचे अभिप्रेत आहे.

---

**राज्य सरकारी कर्मचा-यांच्या विविध मागण्यांबाबत**

**(३६) ४९८५४ (२०-०४-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासकीय चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी मा.वित्त मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीची तीन महिन्यात एकही बैठक न झाल्यामुळे कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष यांनी मा.वित्त मंत्री यांना माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन देऊन आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) सदर मागण्यांच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

राज्य शासकीय चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी मा.वित्त मंत्री यांच्या अध्यक्षेतेखाली मंत्रीमंडळ उप समिती गठीत करण्यात आली नसून शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक अकंपा-१२१५/प्र.क्र.१२७/ दि.२०.६.२०१५ अन्वये राज्यातील राज्य शासकीय/निमशासकीय/महामंडळातील अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी अनुकंपा धोरण सुधारणे त्याचबरोबर प्रकल्पग्रस्तांना शासकीय नोकऱ्यांमध्ये भरती करण्यासंबंधी आढावा घेणे व त्यानुषंगाने प्रभावी उपाययोजना सुचविण्यासाठी गठीत करण्यात आली आहे.

(२) प्रस्तुत संघटनेने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना एका पाल्यास वारसा हक्क तत्वावर नियुक्ती, वैद्यकीय कारणास्तव सेवा करण्यास असमर्थ ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यास सेवेत सामावून घेण्याबाबत, थकित महागाई भत्ता व ७ व्या वेतन आयोगाबाबत त्वरीत घोषणा करणे, तसेच अनुकंपा नियुक्ती धोरणाबाबत गठित करण्यात आलेल्या मंत्रीमंडळ उपसमितीसमोर चर्चेसाठी संघटनेस पाचारण करावे इ. मागण्या केल्या आहेत अनुकंपा नियुक्ती धोरणाबाबतच्या प्रस्तुत संघटनेच्या मागण्या मंत्री मंडळ उपसमितीसमोर विचारार्थ ठेवण्यात येतील.

---

**आष्टी (जि.बीड) येथील आठवडा बाजारासाठी तातडीने कायमस्वरुपी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३७) ५०२२६ (१७-०५-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी (जि.बीड) येथे सद्यःस्थितीत आठवडा बाजार भरत असलेली जागा अपुरी पडत असल्याने शिर्डी-हैदराबाद या राज्यमार्गावर आठवडा बाजार भरत असल्याने अपघाताचा धोका निर्माण झाल्याची गंभीर बाब माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आष्टी येथील आठवडी बाजारासाठी कायमस्वरुपी जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी मा. लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भविष्यातील संभाव्य अपराध रोखण्यासाठी सदर मागणीच्या अनुषंगाने आष्टी येथील आठवडा बाजारासाठी कायमस्वरुपी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०७-२०१६) :** (१) व (२) आष्टी जि.बीड येथे बाजारासाठी जागा अपूरी पडत असल्याने शिर्डी-हैदराबाद राज्य रस्त्यावर आठवडी बाजार भरत असल्याने अपघातचा धोका निर्माण होत आहे. आठवडी बाजारासाठी कायम स्वरुपी जागा उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी यांनी नमूद केले आहे.

(३) आठवडी बाजारासाठी कायम स्वरुपी जागा मिळण्यासाठी नगर पंचयात, आष्टी यांच्याकडून विहित प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरप्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रात बेकायदा अनधिकृत बांधकामांना पाणी पुरवठा न करण्याबाबत**

**(३८) ५०५२४ (१६-०५-२०१६). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरप्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रात बेकायदेशीर/ अनधिकृत बांधकामांना पाणी पुरवठा करू नये असे आदेश मा. आयुक्त, यांनी मा. आयुक्त, महानगरपालिका, पुणे व सर्व ग्रामपंचायतीना माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा. आयुक्त, पीएमआरडीए यांनी दिलेल्या आदेशानुसार मा. आयुक्त, मनपा पुणे व सर्व ग्रामपंचायतीनी काय कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१६) :** (१) आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना असे आदेश देण्यात आलेले नाहीत. तथापि, दिनांक १९/११/२०१५ रोजी झालेल्या पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या सभेतील मंजूर ठरावानुसार, दिनांक ८/१२/२०१५ च्या आदेशान्वये अनधिकृत बांधकामांना पाणीपुरवठा देण्यात येवू नये / नाहरकत पत्र देण्यात येवू नये , यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी सर्व ग्रामपंचायतींना लेखी सूचना द्याव्यात असे कळविण्यात आले आहे.

(२) व (३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी दिनांक २२/०१/२०१६ च्या पत्रान्वये याबाबत करावयाच्या कार्यवाहीच्या सूचना संबंधित गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांना दिल्या आहेत.

---

**कोपरगांव शहरातील विस्थापित झालेल्या टपरीधारकांसाठी योग्य दरात गाळ्यांचे वाटप करण्याबाबत**

**(३९) ५०६१२ (०७-०५-२०१६). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरगांव शहरातील विस्थापित झालेल्या टपरीधारकांसाठी गाळ्यांचे बांधकाम करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टपरीधारकांना गाळे वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) गाळ्यांचे वाटप प्रचलित पध्दतीने जाहीर लिलाव करुन करण्यात यावेत असे निर्देश शासनाने दिले आहेत. जाहीर लिलावादरम्यान गोंधळ झाल्यामुळे लिलाव रद्द करण्यात आले. तद्नंतर जिल्हाधिकारी यांनी ई-लिलाव पध्दतीने गाळयांचे वाटप करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार ई-लिलाव पध्दतीने गाळयांचे वाटप सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालवण (जि.सिंधुदुर्ग) बंदर जेटी येथील वाहनातळाच्या कामाच्या सद्यस्थितीबाबत**

**(४०) ५०६२२ (२०-०५-२०१६).श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) बंदर जेटी येथे बंदर विभागाच्या वतीने सुसज्ज वाहनतळाचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वाहनतळाचे कामासाठी किती निधी मंजूर करण्यात आला व कामाची सद्यस्थिती काय आहे ,

(३) असल्यास, काम केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०८-२०१६) :** (१) होय.
(२) मालवण येथील बंदराचा पर्यटकांच्या दृष्टीकोनातून विकास करण्यासाठी रु. ४९८.३६ लक्ष इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सद्य:स्थितीत वाहन तळाच्या संरक्षक भिंतीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. वाहनतळाच्या काँक्रिटीकरणाचे व गटाराचे काम जवळपास पूर्ण करण्यात आले असून सदर ठिकाणी असलेल्या अतिक्रमणामुळे काही भागात काम पूर्ण करता आलेले नाही. तथापि अतिक्रमण हटविणेबाबत कार्यवाही करुन काम पूर्ण करण्यात येईल.
(३) अतिक्रमण हटविणे ही बाब न्यायप्रविष्ठ असल्याने सदर प्रकरणाचा निकाल लागल्यानंतर उर्वरित काम तात्काळ पूर्ण करण्यात येईल.

---

**किनवट शहरामध्ये (जि.नांदेड) जलशुध्दीकरण यंत्रणा बंद असल्याबाबत**

**(४१) ५०७९३ (०७-०५-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :**सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) किनवट शहरामध्ये (जि.नांदेड)जलशुध्दीकरण यंत्रणा बंद असल्याने अशुध्द गाळयुक्त पाणी पुरवठा केला जात असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आह काय,
(२) असल्यास, सदर जलशुध्दीकरण यंत्रणेची दुरुस्ती करुन शहराला स्वच्छ पाण्याचा पुरवठा करण्याबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) किनवट नगर परिषदेने जलशुध्दीकरण नुतनीकरणाचे व फिल्टर बसविण्याचा प्रस्ताव तयार केला असून त्याबाबतची तांत्रिक तपासणी प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या समुद्रकिना-यावर नवीन बंदरांची निर्मिती करण्याबाबत.**

**(४२) ५१४७२ (२०-०५-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईच्या पूर्व किना-यावर मानखुर्द येथे मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते योगायतन समुहातर्फे उभारण्यात येणा-या मध्यम आकाराच्या खासगी बंदर प्रकल्पाची पायाभरणी माहे डिसेंबर, २०१५ वा त्या दरम्यान करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्याच्या ७२० कि.मी. समुद्रकिना-यावर दर १०० कि.मी. अंतरामागे मोठया मालवाहू जहाजांना सामावून घेणारी बंदरे उभारण्याचा शासनाचा विचार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी तसेच मुंबई बंदरावरील ताण कमी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०८-१६०१) :** (१) होय.
(२) व (३) होय, याबाबत अभ्यास करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे बंदर उभारण्यासाठी भौगोलिक व नौकानयन विषयक तांत्रिक बाबी, बॅकअप क्षेत्र व मालाची उपलब्धता या बाबींचा प्रामुख्याने विचार करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव शहरातील बस सेवा सुरळीत सुरु करण्याबाबत**

**(४३) ५१६०९ (०७-०५-२०१६). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव शहरातील शहरी बस सेवा ही सर्व सामान्यांना परवडणारी वाहतुक सेवा असतानाही मागील काही वर्षापासून पुर्णपणे बंद पडलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हेतु पुरस्पर शहर बससेवा खंडीत करुन खाजगी बस सेवेला प्रोत्याहन देऊन सर्व सामान्य जनतेला शहर बससेवेपासून वंचित ठेवलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरी बससेवा पुर्ववत सुरु होणेसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०७-२०१६) :** (१) जळगाव शहर महानगरपालिकेची परिवहन सेवा दि.५.११.२०१४ पासून अभिकर्त्याच्या वतीने बंद करण्यात आली आहे.
(२) व (३) महानगरपालिकेची परिवहन सेवा बंद झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून दि.१२.१.२०१५ पासून जळगाव शहर ते उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ कैंद्रीय विद्यालय पर्यंत ३ नियतादवारे ६० परतीच्या फेऱ्या सुरु करण्यात आलेल्या आहेत.
तसेच शहरातुन लगतच्या ग्रामीण भागापर्यंत परिवहन महामंडळातर्फे बस सेवा सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव महानगरपालिकाकडे विकासासाठी निधी मिळण्याबाबत**

**(४४) ५१६१७ (०३-०५-२०१६). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव महानगरपालिका निर्माण झाल्यापासून घरकुल, रस्ते, पाणी पुरवठा योजना, विमानतळ, मोफत बससेवा इ. प्रकल्पांसाठी हुडको व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करावी लागत असल्याने महानगरपालिकेचे जळगाव शहराच्या विकासाच्या कामाकडे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील रस्ते, गटारी, सार्वजनिक शौचालय याची दुर्दशा होऊन नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, जळगाव शहरातील विकासाच्या दृष्टीने शासनाने किती निधी वितरित केला,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०७-२०१६) :** (१) हुडको व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड महानगरपालिकेडून करण्यात येत असल्याने शहरातील विकास कामांसाठी महानगरपालिका फंडातून निधी उपलब्ध करणे शक्य होत नसले तरी विकास कामांसाठी प्राप्त होणाऱ्या निधीतून विकास कामे घेण्यात येतात.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) मुलभुत सोयी सुविधा अंतर्गत महानगरपालिकेस रुपये ९ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगाव जिल्हयात घरकुलांची प्रकरणे निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(४५) ५१८४७ (१७-०५-२०१६). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयात घरकुलांची प्रकरणे निधी अभावी मोठया प्रमाणात प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच सद्य:स्थितीत घरकुलासाठी देण्यात येणारा निधी अतिअल्प आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय, व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) जळगाव महानगरपालिका क्षेत्रात IHSDP योजना व रमाई घरकुल योजना राबविण्यात येत असून त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगांव शहरांत महानगरपालिकेच्या दुर्लक्षितपणामुळे संपूर्ण शहर जलमय झाले असल्याबाबत

**(४६) ५१९६७ (१७-०५-२०१६). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव शहरांत महानगरपालिकेच्या दुर्लक्षितपणामुळे संपूर्ण शहर जलमय झाले असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरालगत असलेल्या नाल्यांना संरक्षक भिंत आणि पावसाळ्यापूर्वी नालेसफाई होणे आवश्यक असतांनाही याकडे महानगरपालिकेचे दुर्लक्ष होत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, दरवर्षी जळगाव शहर जलमय न होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०७-२०१६) :** (१) नाही, मात्र ऑगस्ट, २०१४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शहरातील प्रमुख नाल्याला पुरसदृष्य परिस्थिती निर्माण झाली होती.

(२) शहरातील स्मशानभूमी ते नशिराबाद रस्त्यावरील पुलापर्यंतच्या नाल्यास संरक्षक भिंत बांधण्यात आली असून निधीच्या उपलब्धतेनुसार उर्वरीत भाग संरक्षक भिंत बांधण्याचे प्रस्तावित आहे. तसेच महानगरपालिकेमार्फत नालेसफाईचे अभियान हाती घेतले आहे.

(३) महानगरपालिकेमार्फत नालेसफाई अभियान व नाल्यावरील अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्र व राज्य शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेंतर्गत सोलपुर महानगरपालिकेला मिळालेल्या बस गाड्यांबाबत

**(४७) ५२०२० (१३-०५-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्य शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेतून सन २०१५-१६ मध्ये सोलापूर महानगरपालिकेला मिळालेल्या अशोक लेलंड कंपनीच्या ९९ बसगाड्यांपैकी ५९ बसगाडयांची चेसीस सदोष असल्याचे माहे जानेवारी,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,

(२) असल्यास, गत दोन महिन्यांपासून ५९ गाडया बंद ठेवण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बंद ठेवण्यात आलेल्या ५९ गाडया चालू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमामार्फत अशोक लेलँड कंपनीस बसेस बदलून देणेबाबत कायदेशीर नोटीस दिलेली आहे. अशोक लेलँड कंपनीने बसेस (जनबस) बदलून देण्याऐवजी वारंटी कालावधी चालू असल्याने त्यानुसार जरुर ती तांत्रिक दुरुस्ती करुन देण्यास तयार असलेबाबत सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमास कळविले आहे. सदर बदल हा चेसीसशी संबंधित असल्याने बदलास आर.टी.ओ. ची मान्यता असणे आवश्यक असल्याबाबत अशोक लेलँड कंपनीस सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमामार्फत लेखी कळविले आहे.

---

**सोलापूर येथील उजनीची पाणी पातळी खालवल्याने शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी एनटीपीसची जलवाहिनी ताब्यात घेण्याबाबत**

**(४८) ५२२५१ (०३-०५-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर येथील उजनीची पाणी पातळी खालावल्याने शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी एनटीपीसची जलवाहिनी ताब्यात घेण्यासंबंधी मा.मुख्यमंत्री यांनी सोलापूरात दोन वेळा बैठक घेतली असून आश्वासन दिले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांच्या आश्वासनानुसार एनटीपीसी जलवाहिनीचे काम १५ मार्च, २०१६ पर्यंत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
सोलापूर शहर पाणीपुरवठा योजनेचे नियोजन करणेबाबत दि.०६.०९.२०१५ व दि.२४.११.२०१५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे झालेल्या बैठकित मा.मुख्यमंत्री यांनी निर्देश दिल्याप्रमाणे सोलापूर महानगरपालिकेने कामाचे अंदाजपत्रके व आराखडे आहे व सध्या डी.पी.आर तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथेभारत (नागरी) अभियांनांतर्गत शौचालय उभारणीचा कार्यक्रम अनुदाना अभावी रखडल्याबाबत**

**(४९) ५२४७५ (०३-०५-२०१६).श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथे केंद्र व राज्य शासनामार्फत भारत (नागरी) अभियांनांतर्गत ६०७३ ठिकाणी शौचालय उभारणीचा कार्यक्रम महानगरपालिकेने हाती घेतला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत ९७६ शौचालयाचे बांधकाम पूर्ण झाले आहे तर ८८५ शौचालयाचे बांधकाम सुरु आहे महानगरपालिकेने ४२१७ लाभार्थ्यांना निम्मे अनुदान अदा केले परंतु पुढील अनुदान रखडल्याने शौचालय उभारणीच्या कार्यक्रमाला खीळ बसली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने निर्णय घेऊन सदर रखडलेले अनुदान लाभार्थ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत नाशिक महानगरपालिका क्षेत्रासाठी ७,५२८ वैयक्तिक घरगुती शौचालय बांधकामाचे उद्दिष्ट आहे. नाशिक महानगरपालिकेर्मात ६,८०४ लाभार्थी कुटुंबांना प्रतयेकी रुपये ६,०००/- प्रमाणे पहिल्या हप्त्याचा निधी म्हणून एकूण रुपे ४.०८२४ कोटी तसेच १६४४ कुटुंबांना दुसऱ्या हप्त्याचा निधी म्हणून रुपये ९८.६४ लक्ष असे एकूण रुपये ५.०६८८ कोटी वाटप करण्यात आलेले आहेत आतापर्यंत एकूण ३,०८६ वैयक्तिक घरगुती शौचालयाचे बांधकाम पूर्ण झालेले आहेत. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत नाशिक महानगरपालिकेस केंद्र व राज्य शासनाचा मिळून एकूण रुपये ५.६१३९ कोटी एवढा निधी वितरीत करण्यात आलेला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**इरई धरणाचे पाणी चंद्रपूर शहरासाठी वाढवून घेण्याबाबत**

**(५०) ५३४२७ (१९-०५-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रातील हॉस्पीटल वार्ड, सिव्हील लाईन, रामनगर, पठाणपुरा, विठ्ठल मंदिर वार्ड, भानापेठ वार्ड, बालाजी वार्ड, एकोरी वार्ड, घुटकाळा वार्ड, जीवन ज्योती कॉलनी, तुकूम परिसरातील वार्ड, येथे गत एक महिन्यापासून अनियमित नळाव्दारे पाणी पुरवठा होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रात फक्त ५५ टक्के भागात नळाची पाईप लाईन असून उर्वरीत भागात नळाव्दारे पाणी पुरवठा करण्याबाबत कोणतीही योजना आखण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, चंद्रपूर शहरातील अस्तित्वात असलेली पाणीपुरवठयाची पाईपलाईन ही सुमारे ६० वर्ष जुनी असून सदर पाईपलाईनला अनेक ठिकाणाहून गळती सूरु (लिकेजेस) आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने, चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रातील संपुर्ण नागरीकांना नळाव्दारे पाणी वितरण करण्यासाठी कोणती योजना आखली आहे व त्याची अंमलबजावणी साधारणत: केव्हा पर्यंत होणार आहे,

(५) तसेच इरई धरणाचे पाणी चंद्रपूर शहरासाठी वाढवून घेण्यासाठी शहरातील पठाणपूरा व रहमतनगर येथील सिव्हरेज ट्रिटमेंट प्लॉटचे पाणी महाजनकोला देण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सुजल निर्मल अभियानांतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या सर्व्हेक्षणानुसार शहरात ३३.८३% क्षेत्रात वितरण व्यवस्थेच्या पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो. उर्वरित भागात सद्य:स्थितीत १८ कुपनलिका व ६२५ हातपंपाव्दारे पाणीपुरवठा होत आहे.

चंद्रपूर शहरातील पाणीपुरवठा योजना जुनी असल्यामुळे, सदर योजनेचे नुतनीकरण व वाढीव पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने चंद्रपूर शहराची अमृत योजनेत निवड झालेली आहे. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून कार्यवाही सुरु आहे.

(३) चंद्रपूर शहरामध्ये विविध आकाराची १४८.४९ कि.मी. पाईपलाईन आहे, यापैकी अंदाजे ७० कि.मी. पाईपलाईन ही ३० ते ४० वर्षे जुनी आहे. पाईपलाईन गळतीचे प्रमाण अत्यंत अल्प असून, पाईपलाईन मध्ये गळती निदर्शनास आल्यानंतर त्वरीत दुरुस्त करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(४) केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून कार्यवाही सुरु असून, आणखी २ ते ३ वर्षाचा कालावधी अपेक्षीत आहे.

(५) व (६) चंद्रपूर महानगरपालिकेचे दिनांक २३/४/२०१० व दिनांक ३१/०३/२०११ अन्वये सिव्हरेज ट्रिटमेंट प्लांट मधील पाण्याचा पुर्नवापर करण्याबाबत मान्यता असल्यास इच्छापत्र महानगरपालिकेस देण्याबाबत महाजनकोला कळविण्यात आलेले आहे.

त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या दिनांक १३/०५/२०१६ च्या पत्रान्वये ट्रिटमेंटव्दारे शुध्द केलेले पाणी महाजनेकोस उपलब्ध करणेबाबत महानगरपालिकेने सहमती दर्शविली असून, याबाबत महाजनकोचे मत मागविण्यात आलेले आहे. असे आयुक्त, चंद्रपूर महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.